**प्रसिध्दी पत्रक** दिनांक:-30/07/2020

**श्री.आतिश दशरथ सरफाळे, वय 32 वर्ष, पोलीस नाईक, ब.नं.1382, नेमणुक पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर यांनी 3000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | श्री.आतिश दशरथ सरफाळे, वय 32 वर्ष, पोलीस नाईक, ब.नं.1382, नेमणुक पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर अंतर्गत जिल्हा शासकिय रुग्णालय, उस्मानाबाद पोलीस चौकी |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.30.07.2020 रोजी उस्मानाबाद येथे ताजमहल टॉकीज समोरील सीटी हॉटेलमध्ये |
| तपासी अधिकारी | श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक |
| लाचेची रक्कम मागणी | 5,000/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 3000/- रु लाचेची मागणी केली व 3000/- रु लाच रक्कम स्विकारली. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या विरोधातील लोकांविरुध्द मोठी कारवाई करण्यासाठी तक्रारदार यांचा चांगला जबाब घेवुन डॉक्टरांचे सर्टिफिकेट घेवुन देणे या कामासाठी |

यातील तक्रारदार हे शेती व्यवसाय करीत आहेत. तक्रारदार व त्यांचे चलुत भाऊ यांचेत शेतीचे बांधाचे कारणावर भांडण तक्रारी होत्या त्यामध्ये तक्रारदार हे जखमी झाल्याने त्यांना दुरक्षेत्र पाडोळी येथील पोलीसांनी पत्र देवुन प्राथमिक आरोग्य केंद्र समुद्रवाणी येथे पाठविले हाते. वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र समुद्रवाणी यांनी तक्रारदार यांच्यावर प्राथमिक उपचार करुन त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा शासकिय रुग्णालय, उस्मानाबाद येथे रेफर केले होते त्यामुळे तक्रारदार हे जिल्हा शासकिय रुग्णालय, उस्मानाबाद येथे जावुन दवाखाना ॲडमीट झाले होते.

दि.29.07.2020 रोजी यातील आलोसे श्री.सरफाळे पोलीस यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरोधातील लोकांविरुध्द मोठी कारवाई करण्यासाठी त्यांचा चांगला जबाब घेवुन डॉक्टरांचे सर्टिफिकेट घेवुन देणे या कामासाठी तक्रारदार यांचेकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्री.सरफाळे, पोलीस यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.30.07.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री. अशोक हुलगे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आतिश सरफाळे, पोलीस नाईक यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कारणासाठी दि.30.07.2020 रोजी पंचासमक्ष 5,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 3,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.30.07.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता **श्री.आतिश दशरथ सरफाळे, वय 32 वर्ष, पोलीस नाईक, ब.नं.1382, नेमणुक पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर अंतर्गत जिल्हा शासकिय रुग्णालय, उस्मानाबाद पोलीस चौकी** यांनी उस्मानाबाद येथे ताजमहल टॉकीज समोरील सीटी हॉटेलमध्ये तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 3,000/- रुपये लाच रक्कम स्वत: स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अरविंद चावरीया, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद, श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोह/रविंद्र कठारे, पोना/मधुकर जाधव, पोना/अर्जुन मारकड, पोशि/विष्णु बेळे, समाधान पवार, महेश शिंदे व चालक ज्ञानदेव कांबळे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.श्री.अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8530255500

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100,

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-**dyspacbosmanabad@mahapolice.gov.in, 2)dysposmanabad@gmail.com

कार्यालय पोलीस उप अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

**(प्रशांत संपते)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.